

# 'मिसेस' मेलबर्नमध्ये

मुंबई टाइम्स टीम

सध्या अभिनेत्री **सान्या मल्होत्रा** भलतीच खुश आहे. तिची प्रमुख भूमिका असलेल्या 'मिसेस' या सिनेमाचा प्रीमियर 'इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्न'मध्ये होणार आहे. दिग्दर्शक आरती कदवसोबत सान्या या फेस्टिव्हलमध्ये सहभागी होणार आहे. १५ ऑगस्टपासून हा महोत्सव सुरू होत असल्यानं आपलं काम पुन्हा एकदा जागतिक स्तरावर पोहोचणार असल्यानं ती आनंदात आहे. या आधीही सान्यानं 'इंडियन फिल्म फेस्टिवल ऑफ मेलबर्न'मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कारासाठी नामांकन मिळवलं होतं. 'मिसेस' हा सिनेमा प्रसिद्ध मल्याळी सिनेमा 'द ग्रेट इंडियन किचन'चा हिंदी रिमेक असल्याचं कळतंय. 'हा सिनेमा माझ्यासाठी अत्यंत खास आहे; कारण सामाजिक व कौटुंबिक अपेक्षा पूर्ण करता-करता स्वतःच्या स्वप्नांची पूर्तता करता-करता दमछाक होणाऱ्या स्त्रीची ही कहाणी यात आहे. ही कथा प्रेक्षकांना नक्कीच आपलीशी वाटेल. महोत्सवामध्ये आपली फिल्म दाखवली जाणं ही अभिमानास्पद गोष्ट असते,' असं सान्या सांगते. या सिनेमाव्यतिरिक्त सान्या 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी', 'ठग लाइफ' आणि अनुराग कश्यपच्या एका नाव ठरलेल्या सिनेमात झळकणार आहे.